The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत साहित्यावर आधारित निवडक मराठी चित्रपट - एक अवलोकन

**मार्गदर्शक : प्रोफेसर डॉ. एम. बी. धोंडगे**
**संशोधक विद्यार्थी : श्री केशव अंगद कांदे**
श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय सिरसाळा, ता.परळी

**प्रस्तावना**

आपल्या महाराष्ट्राला संत विचारांची मोठी परंपरा लाभलेली आहे. अकराव्या शतकाच्या आधीपासून अनेक संत महंत या भूमीत होऊन गेले. मात्र बाराव्या शतकात जन्मलेले संत ज्ञानेश्वर हे वारकरी संप्रदायातील आद्य संत म्हणून ओळखले जातात. त्यांच्या नंतर संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत जनाबाई, संत गोरोबा कुंभार अशी संतांची खूप मोठी परंपरा महाराष्ट्राला लाभलेली आहे. या संतांनी प्रचंड साहित्य रचले. त्यात संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ सर्वसामान्यांना कळेल, अशा मराठी या लोकभाषेतून रचना आहे. जो मराठीतील पहिला ग्रंथ मानला जातो. त्यानंतर या संतांनी अनेक अभंग, ओव्या, गवळणी, भारुडे, काव्ये आणि विविध साहित्य रचले. राजकीय अराजकता आणि अस्थिरतेच्या वातावरणात पिळल्या जाणाऱ्या समाजाला आणि काम, क्रोध, मद, मत्सर अशा विकाराने ग्रस्त झालेल्या समाजाला, अध्यात्मिक डोस पाजून माणसाला आत्मिक आनंद देण्याचे कार्य संत साहित्याने केल्याचे दिसते. सर्वत्र अस्ताव्यस्त विखुरलेल्या समाजाला एकत्र करून मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखवला. वेगवेगळ्या कालखंडात होऊन गेलेल्या या संतांचे कार्य नव्या पिढीला समजावण्यासाठी, त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकण्यासाठी, या संतांच्या जीवनावर अनेक चित्रपट तयार झाले आहेत. त्यातील निवडक चित्रपटांचा या ठिकाणी आपण आढावा घेऊया.

**संत जीवनावरील मराठी चित्रपट**

१९१२ ला चित्रपट सृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांनी 'राजा हरिश्चंद्र' या चित्रपटाने चित्रपटसृष्टीचा पाया रचला. मराठीतील पहिला चित्रपट हा 'भक्त पुंडलिक' होता. ज्याप्रमाणे दादासाहेब फाळके मुंबई चित्रनगरी निर्माण करत होते, तसेच ते पुणे, खडकी, कोल्हापूर, नाशिक या भागातही चित्रपट निर्मितीचे कार्य करत होते. त्यावेळी बाबुराव पेंटर हे त्या चित्रपटासाठी सेट्स तयार करत असत. 'अयोध्येचा राजा' हा पहिला मराठी बोलपट होता. यावरून एक लक्षात येते की कलेला व्यवसाय समजणाऱ्या या चित्रपटसृष्टीने पौराणिक, धार्मिक ग्रंथावर चित्रपट बनवून आपली आस्था व्यक्त केली. म्हणजे पौराणिक, ऐतिहासिक, आणि विशेष म्हणजे जनसामान्यांना प्रसिद्ध असलेल्या व्यक्तिरेखांच्या जीवनावर चित्रपट बनविणे हा चित्रपट निर्मात्यांचा आवडीचा विषय होता. अशा मानसिकतेत महाराष्ट्रातील संत

संप्रदायातील महान संतांच्या जीवन चरित्राची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे काम मराठी चित्रपट सृष्टीने केल्याचे दिसते मराठीतून अनेक संतांच्या जीवनावर चित्रपट निर्माण झाले. त्यातील काही निवडक चित्रपटांचा आज आपण इथे अभ्यास करणार आहोत.

**संत ज्ञानेश्वर**

१२ व्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेलेले महाराष्ट्रातील महान संत ज्ञानेश्वर महाराज औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील आपेगाव येथे जन्माला आले. ज्ञानेश्वर विठ्ठलपंत कुलकर्णी भागवत संप्रदायाचे प्रवर्तक म्हणून ओळखले जातात भगवत गीतेवर आधारित 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ सर्वसामान्यांसाठी त्यांनी मराठी (मऱ्हाटी) भाषेत रचला. त्यावेळी त्यांचे वय अवघे सोळा वर्षाचे होते. याशिवाय 'अमृतानुभव या ग्रंथाची ही रचना त्यांनी केली त्यांच्या रचना या मराठी साहित्यातील मैलाचे दगड मानल्या जातात. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या विचारांमध्ये अद्वैतवाद, वेदांत तत्त्वज्ञान आणि विठ्ठलाच्या भक्तीवर भर देण्यात आला आहे. म्हणूनच हिंदू धर्मातील भक्तीपरंपरेचे त्यांना संस्थापक असे म्हटले जाते प्रभात फिल्म कंपनीने १९४० मध्ये त्यांच्या जीवनावर आधारित 'संत ज्ञानेश्वर' हा चित्रपट बनवला. या चित्रपटाची कथा सुरू होते तेव्हा आपेगाव येथील विठ्ठल गोविंद कुलकर्णी आणि रुक्मिणी यांचा विवाह झाला होता. त्यांना चार मुले ही होती. पैकी ज्ञानेश्वर हे त्यांचे दुसरे मूल होते विठ्ठल कुलकर्णी धार्मिक होते. परंतु आपले लग्न झाले नाही असं खोटं बोलून संन्यास घेण्याची त्यांची इच्छा होती. मात्र त्यांचं खोटे पण जास्त काळ लपवू शकत नाही. एक दिवस सत्य बाहेर येते. त्यानंतर ब्राह्मण जातीतून विठ्ठल कुलकर्णी व त्यांच्या कुटुंबाला बहिष्कृत केले जाते. नंतर विठ्ठल कुलकर्णी आणि रुक्मिणी यांनी प्रयाग येथे नदीत उडी मारून आपले जीवन संपविले. त्यांची अनाथ मुले भिकेवर वाढली, नंतर एका शेतकऱ्याने त्या मुलांना आसरा दिला, आणि त्यांना सांभाळले. इथेच ज्ञानेश्वरांनी वयाच्या सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली. या काळात त्यांच्याकडून अनेक चमत्कार घडले. रेड्याच्या मुखातून वेद वदवणे, उडत्या भिंतीवर स्वार होणे, अशा चमत्कारिक घटना या चित्रपटात दाखवल्या आहेत. आनंदकुमार आणि शिवराम वाशीकर यांनी या चित्रपटाची कथा व संवाद लिहिले आहेत. तर विष्णुपंत गोविंद दामले आणि शेख फत्तेलाल यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले. या चित्रपटात ज्ञानेश्वर महाराजांची भूमिका शाहू मोडक या अभिनेत्याने केली होती, आणि त्याच्या त्यांच्यासोबत दत्ता धर्माधिकारी, पंडित ताम्हणकर, शांता मुजुमदार, सुमती गुप्ते, इत्यादी कलावंतांनी यात भूमिका केल्या आहेत. या चित्रपटातून ज्ञानेश्वर महाराजांचे जीवन, त्यांचे कार्य आणि विठ्ठलावर असलेली त्यांची निःसीम श्रद्धा दाखवण्यात आलेली आहे.

**संत तुकाराम**

प्रभात फिल्म कंपनीने नेहमीच दर्जेदार व आशयप्रधान चित्रपटांची निर्मिती केलेली आहे. या फिल्म कंपनीचा १९३६ मध्ये आलेला 'संत तुकाराम' हा मराठी चित्रपट देखील खूप गाजला होता. १७ व्या शतकात होऊन गेलेल्या संत तुकाराम महाराजांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकणारा हा अतिशय अभ्यासपूर्ण चित्रपट होता. तुकाराम महाराजांचे जीवन हे संपूर्ण वारकरी संप्रदायासाठी प्रेरणा स्त्रोत आहे. तुकाराम महाराजांनी आपल्या अभंग, ओव्यातून समाजाला भक्तीचा खरा व सोपा मार्ग सांगितला आहे. शिवाय हिंदू धर्मातील कर्मकांडावर आणि अंधश्रद्धेवर कडाडून प्रहार करणारे संत तुकाराम आपल्या साहित्यातून लोकांना प्रेरित करताना दिसतात. या चित्रपटाची कथा सुरू होते तेव्हा तुकाराम महाराज त्यांची पहिली पत्नी आणि मूल गमावतात. त्यानंतर त्यांचा या भौतिक जगातून रस संपतो. त्यानंतर आपली दुसरी पत्नी जिजाई (आवली) आणि दोन मुलं असा संसार त्यांचा असतो. मात्र या संसारिक जीवनाकडे त्यांचे लक्ष नसते. त्यांच्या भक्तीमुळे त्यांची लोकप्रियता वाढत जाते. त्यामुळे काही ब्राह्मणांना त्यांचा हेवा वाटू लागतो. त्यात काही ब्राह्मण तुकारामांनी आपले श्लोक चोरले, असा दावा करतात. त्यानंतर पंडित रामेश्वर शास्त्री या विषयाचा छडा लावण्याचा प्रयत्न करतात आणि निकाल तुकाराम महाराजांच्या विरोधात जातो. व तुकारामांनी आपली गाथा नदीत विसर्जित करावी आणि धर्माची सार्वजनिक चर्चा करू नये असा आदेश रामेश्वर शास्त्री देतो. त्यांचा आदेश स्वीकारून तुकाराम महाराज तेरा दिवस नदीवर उपोषणाला बसतात. मात्र देव त्यांच्या पाठीशी असतो. शास्त्री गंभीर आजारी पडतात. ज्याचा अर्थ ते दैवीय प्रतिशोध म्हणून करतात. ज्याने आरोप केला तो ब्राह्मण छत्रपती शिवाजी महाराजांकडे जातो. आणि आपले गाऱ्हाने मांडतो. छत्रपती शिवाजी तुकाराम महाराजांना भेटायला येतात व त्याना काही भेटवस्तू देऊन त्याची परीक्षा घेतात. मात्र तुकाराम महाराज या भेटवस्तू स्विकारण्यास नकार देतात. आणि शिवाजी राजे तुकाराम महाराजांचे भक्त होतात. नंतर तो ब्राह्मण मोगलांकडे जाऊन शिवाजीराजांची इत्यंभूत माहिती सांगतो व त्यांचा ठाव ठिकाण सांगतो. मोगल शिवाजीराजांना पकडण्यासाठी देहूला येतात, तेव्हा तुकाराम महाराज शिवाजी राजांचे रक्षण करतात. आणि शेवटी देव तुकाराम महाराजांना स्वर्गात नेण्यासाठी येतो अशी या चित्रपटाची कथा आहे. तुकाराम महाराजांना देव भेटणे, आकाशातून धान्याचा वर्षाव होणे, आजारी मुलाला बरे करणे, गाथा पाण्यावर तरंगणे असे तुकाराम महाराजांचे विविध चमत्कार या चित्रपटात दाखवलेले आहेत.. विष्णुपंत गोविंद दामले व शेख फत्तेलाल यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले असून शिवराम वाशीकर यांची ही कथा आहे. आणि केशवराव भोळे यांनी या चित्रपटाला संगीत दिले आहे. तुकाराम महाराजांच्या मुख्य भूमिकेत विष्णुपंत पागनीस, गौरी जिजाई, बि.

नारेंद्रकर, शंकर कुलकर्णी, शांता मुजुमदार, मास्टर छोटू, पंडित दामले इत्यादी कलाकारांनी या भूमिका साकारल्या आहेत.

**संत जनाबाई**

१९३८ मध्ये रवींद्र पिक्चर्स या फिल्म कंपनीने 'संत जनाबाई' या मराठी संतपटाची निर्मिती केली आहे. नानासाहेब सरपोतदार, नारायण देव्हारे यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटाची कथा, पटकथा व संवाद मो.ग. रांगणेकर यांनी लिहिले होते. आणि या चित्रपटाला संगीत दिले होते विष्णुपंत पागणीस यांनी आणि हिराबाई बडोदेकर, कमलाबाई बडोदेकर, अनंत मराठे, एस बाबुराव, सुरेश बाबू माने, वसंत कानसे इत्यादी कलाकार यांनी यात भूमिका केल्या होत्या. मात्र पुढे संत जनाबाईंच्या जीवनावर आधारित दुसरा चित्रपट १९४९ मध्ये प्रभात चित्र कंपनीने निर्माण केला. गोविंद घाणेकर यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद ग. दि. माडगूळकर यांनी लिहिली सुधीर फडके यांचे संगीत या चित्रपटाला लाभले होते. संत नामदेव यांच्या वडिलांनी एका अनाथ असलेल्या बालिकेला पंढरपूरहून आपल्या घरी आणले या जनाबाईच्या भक्तीतील विविध घटना प्रसंग यात असून, नामदेव आणि जनाबाई यांच्या भक्तीने प्रसन्न झालेला पांडुरंग त्यांना प्रत्येक कामात मदत करत असतो. काही कारणाने नामदेवांचे कुटुंब आर्थिक अडचणीत सापडतं. याचवेळी पांडुरंगाच्या गळ्यातील कंठा चोरीला जातो. आणि जनाबाई वर चोरीचा आळ येतो. तिला समाजाकडून विविध प्रकारचा त्रास दिला जातो. आणि शेवटी विठ्ठल स्वतः त्यांच्या मदतीला येतो. आणि तिला या संकटातून बाहेर काढतो अशी ही कथा आहे.

मराठी मातीतील अनेक संतांच्या जीवनावर मराठीतून चित्रपट निर्माण झालेली आहेत. त्यात संत गोरोबा कुंभार, शेगावचे गजानन महाराज, संत चोखोबा इत्यादी संतांचे कार्य समाजाला माहित होण्यासाठी त्यांच्या जीवनावर अनेक मराठीतून चित्रपट निर्माण झालेले आहे. त्यातील काही जुने व प्रसिद्ध चित्रपट आहेत.

**गृहीतके**

१) साहित्यातून थोर संतसह समजत नसतात. मात्र चित्रपटातून संतांचे जीवन कार्य खूप सोपे करून सांगितले जाते व ते लोकांच्या सहज लक्षात राहते.

२) महाराष्ट्रातील संतांनी या मातीतील लोकांसाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्च केले आहे त्यांचे कार्य समाजापुढे आणणे या उद्देशाने या संतपटाची निर्मिती झालेली आहे.

३) आज पासून चारशे वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या संतांचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे कार्य या चित्रपटांनी केलेले आहे.

४) चित्रपट रूपाने संतांचे कार्य जोपासल्यामुळे तो एक ऐतिहासिक ठेवा निर्माण झाला आहे. नव्या पिढीला यातून खरे थोर संत करण्यास मदत मिळेल.

**समारोप**

चित्रपटसृष्टी आज पूर्णपणे व्यावसायिक झाली आहे, मात्र काही सात्विक विचारांचे निर्माती ही या ठिकाणी आहेत, जे आणखी नव्या रूपात त्या संतांचे कार्य समाजापुढे आणतील अशी अपेक्षा आहे. संतांचे साहित्य तर अनमोल ठेवा आहेच. मात्र त्यांच्या जीवनावरील चित्रपट देखील महत्वाचा ठेवा आहे असे म्हणता येईल. तो जतन करणे ही आवश्यक आहे.

**संदर्भसूची**

१) ज्ञानेश्वरी खंड, पैठणी प्रकाशन, औरंगाबाद, ४२ वी आवृत्ती, पृष्ठ क्रमांक १६५.
२) तुकाराम गाथा खंड चार, आळंदी.
३) ह भ प विश्वनाथ शास्त्री - संत तुकारामांचे चरित्र, प्रथम आवृत्ती, पृष्ठ क्रमांक ६४.
४) डॉ, रमेश वाणी - संत साहित्य, अमृता प्रकाशन नाशिक, प्रथम आवृत्ती पृष्ठ क्रमांक ०६.